



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २९३, शुक्रवार ९ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सुपा-नगर मार्गे पुणे ते औरंगाबाद रेल्वे मार्ग सुरू करा

### ■ खा. नीलेश लंके यांचे रेल्वेमंत्र्यांना साकडे ■ शिरूर ते औरंगाबाद सहा पदरी रस्त्याचीही नितीन गडकरींकडे मागणी

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**पुणे-नगर-औरंगाबाद दरम्यान झालेले औद्योगिकरण तसेच धार्मिक स्थळांचा विचार करता सुपा-नगर मार्गे पुणे ते औरंगाबाद रेल्वे मार्ग सुरू करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. दरम्यान शिरूर ते औरंगाबाद हा रस्ताही सहा पदरी करण्याची मागणी लंके यांनी बुधवारी मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.**

रेल्वेमार्ग तसेच रस्त्यांबाबत मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर खा. लंके यांनी गुरूवारी सकाळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. ते म्हणाले, औरंगाबाद-नगर-पुणे हा रेल्वेमार्गे अनेक अर्थाने महत्वाचा आहे. या मार्गावर श्री क्षेत्र देवगड देवस्थान, शनी शिंगणापूर, शिर्डी, रांजणगांव गणपती अशी महत्वाची तिर्थक्षेत्रे आहेत. त्यांना मोठया संख्येने भाविक, पर्यटक भेटी देतात. याशिवाय या मार्गावर वाळुंज, औरंगाबाद, सुपा, शिरूर, रांजणगांव गणपती, शिक्रापुर, पुणे अशी औद्योगिक क्षेत्रे आहेत. हा मार्ग औरंगाबाद व पुणे विमानतळांना जोडतो. या मार्गावरून दररोज मोठया संख्येने उद्योजक, व्यापारी, कर्मचारी, कामगार वर्ग प्रवास करतात. पुणे आणि औरंगाबादची वाढती लोकसंख्या आणि वाहतूकीची समस्या पाहता हा रेल्वे मार्ग महत्वाचा आहे. या रेल्वेमार्गामुळे शहरी व्यवस्थेवरील ताण कमी पडणार असल्याचे सांगतानाच रेल्वे मंत्र्यांनी अधिकाऱ्याना या मार्गाचे अंदाजपत्रक तयार करण्याची सुचना दिली आहे. त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक वाटल्याची पुस्तीही खा. लंके यांनी जोडली.

शिरूर ते औरंगाबाद सहापदरी रस्ता झाल्यास पुण्यातील वाघोलीनंतर भेडसावणारी वाहतूकीची मोठी समस्या कायमची दुर होईल. या रस्त्यावर होणारे अपघात थांबविण्यासाठी आवष्यक तिथे उडडाण पुलांचीही मागणी नितिन गडकरी यांच्याकडे केल्याचे खा. लंके म्हणाले. नगर ते शिर्डी या रस्त्याचे काम गेल्या सहा ते सात वर्षांपासून रखडलेला आहे. सध्याच्या ठेकेदाराला काळया यादीत टाकून नव्या ठेकेदारास काम दिले जाईल काम लवकरात लवकर सुरू केले जाईल अशी ग्वाही गडकरी यांनी दिल्याचे खा. लंके म्हणाले.

शिरूर ते औरंगाबाद सहापदरी रस्ता झाल्यास पुण्यातील वाघोलीनंतर भेडसावणारी वाहतूकीची मोठी समस्या कायमची दुर होईल. या रस्त्यावर होणारे अपघात थांबविण्यासाठी आवष्यक तिथे उडडाण पुलांचीही मागणी नितिन गडकरी यांच्याकडे केल्याचे खा. लंके म्हणाले. नगर ते शिर्डी या रस्त्याचे काम गेल्या सहा ते सात वर्षांपासून रखडलेला आहे. सध्याच्या ठेकेदाराला काळया यादीत टाकून नव्या ठेकेदारास काम दिले जाईल काम लवकरात लवकर सुरू केले जाईल अशी ग्वाही गडकरी यांनी दिल्याचे खा. लंके म्हणाले.



■ सुपा-नगरमार्गे पुणे ते औरंगाबाद रेल्वेमार्ग सुरू करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

### नगर-कल्याण रेल्वेमार्गाचीही मागणी

नगर ते कल्याण या रेल्वेमार्गाचीही खा. लंके यांनी रेल्वे मंत्र्यांकडे मागणी केली. शेतकऱ्यांसाठी हा मार्ग महत्वाचा असून शेतमालाची वाहतूक कल्याण, मुंबई सारख्या शहरांपर्यंत या मार्गाने सुलभ होऊ शकेल. या ठिकाणी मोठया संख्येने उद्योजक, व्यापारी, नोकरदार प्रवास करत असून या मार्गही सुरू करण्याची मागणी खा. लंके यांनी केली.

### बेलापूर, विसापूर स्थानकांवर थांबा

बेलापूर रेल्वे स्थानकावरील बंद करण्यात आलेली साई फास्ट पॅसेंजर पुन्हा सुरू करावी तसेच वाराणसी एक्सप्रेस, साईनगर शिर्डी एक्सप्रेस या गाडयांनाही या स्थानकावर थांबा देण्याची मागणी खा. लंके यांनी केली. कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या साईनगर ते दादर ११०४१ व ११०४२ या दोन गाडयांना श्रीगोंदे तालुक्यातील विसापूर रेल्वे स्थानकावर थांबा देण्याची मागणीही लंके यांनी केली.

### वांबोरी येथील रस्त्यांची दुरूस्ती तसेच ओव्हरब्रिज

धामोरी-वांबोरी गेट क्र.३५ ए बंद केल्यामुळे या मार्गावरील नागरीकांना, वाहनचालकांना गेट क्र.३५ बी ओलांडून जावे लागते. रेल्वे हद्दीच्या पूर्वकडील व पश्चिमेकडील रस्त्यांची दुरावस्था झाल्याने विद्यार्थी तसेच नागरीकांना जाणे, येणे कठीण होत आहे. रेल्वे प्रशासनाने पूर्वेकडील रस्त्यांची दुरूस्ती करावी अशी मागणी खा.लंके यांनी केली. गेट क्र. ३५ बी ओलांडून जावे लागत असल्याने या मार्गावर रेल्वे क्रॉसींगसाठी उडडाणपुलही अत्यंत आवष्यक आहे. या भागात देवीचे मंदीर असल्याने आरसीसी ओव्हरब्रीज असावा जेणेकरून देवीच्या मंदिरास कोणतीही क्षती पोहणार नाही ही बाबही खा. लंके यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

### विकासाच्या आड येणारांना कायद्याचा धाक दाखवावा लागेल

सुपा एमआयडीसी विकसीत होत आहे. उत्तरेत संगमनेर विकसीत आहे. दुसरीकडे नगर शहर मात्र विकसीत होताना दिसत नाही. एकीकडे विकास तर दुसरीकडे भकास अशी अवस्था असल्याचे पत्रकारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर लंके म्हणाले, नगरच्या एमआयडीसीबाबत मी यापूर्वी प्रयत्न केले होते. आताही नगरच्या एमआयडीसीला उर्जितावस्थेत आणण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. एमआयडीसीतील हप्तेखोरी,दमदाटी थांबविली जाईल. हे थांबल्याशिवाय विकास होणार नाही. राजकारणाच्या सोईसाठी हे वापरले जाणार असेल तर कधीही विकास होणार नाही. विकासाच्या आड येणारांना वेळप्रसंगी कायद्याचा धाकही दाखवावा लागेल असे खा. लंके यांनी सांगितले.

### अरणगांव, जामखेडच्या रस्त्यांकडे वेधले लक्ष

नगर शहराचा बायपास अरणगांमधून गेलेला आहे. त्यामुळे या गावाला जोडणारे रस्ते बंद झाले आहेत. या परीसरातील नागरीकांच्या सोईसाठी या रस्त्याच्या दोन्ही बाजूस उपरस्ते करावेत तसेच जामखेड भागात ज्या रस्त्यांची कामे बंद अवस्थेत आहेत. त्यांची कामे सुरू करावीत अशी मागणीही नितीन गडकरी यांच्याकडे केल्याचे खा. लंके म्हणाले.

### पारनेरची उमेदवारी नेतृत्व ठरवेल

पारनेरमधून तुमच्या पक्षाचा उमेदवार कोण या प्रश्नावर बोलताना खा. लंके म्हणाले, आमच्या पक्षाचा उमेदवार कोण हे ठरविणारा मी कार्यकर्ता नाही. पक्षाला नेते मंडळी असतात. पक्षाचे नेतृत्व जो उमेदवार देईल त्याला विजयी करणे ही माझी जबाबदारी असणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

### ज्येष्ठ नागरिकांना भाडयात सवलत हवी

रेल्वे प्रवासात ज्येष्ठ नागरिकांसाठी ४० टक्के तर महिला ज्येष्ठ नागरीकांसाठी ५० टक्के सवलत देण्यात येत होती. कोरोना काळापासून ही सवलत बंद करण्यात आली आहे. राधामोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय स्थायी समितीच्या अहवालात ज्येष्ठ नागरीकांसाठी सुट देण्याची शिफारस करण्यात आली आहे. मात्र हा निर्णय अद्यापही प्रलंबित असून त्यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावी अशी मागणीही खा. लंके यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली.

### गव्हाणवाडी-बेल्हा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करा

**गव्हाणवाडी ते बेल्हा या रस्त्याची सध्या टेंडर प्रक्रिया सुरू असून हा बागायत पट्टा असल्याने डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीटचा रस्ता करावा अशी मागणी करण्यात आल्याचेही खा. लंके म्हणाले.**

---

# गायरानाचा वाद पेटला, पठारवाडीत बंद!

### ■ खडी क्रशरलाही विरोध ■ निघोजमधील ग्रामस्थांवर आक्षेप

निघोज : प्रतिनिधी

**पठारवाडी येथील ६१७ एकर गायरान लाटण्याच्या प्रकाराविरोधात पठारवाडी ग्रामस्थ एकवटले असून या भागातील स्टोन क्रशरही बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. गायरान वाचविण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केलेल्या ग्रामस्थांना दमदाटी करण्यात येत असून दमदाटी करणारांविरोधात कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ पठारवाडी ग्रामस्थांनी गुरूवारी कडकडीत बंद पाळून निषेध नोंदविला.**

न्यायालयात याचिका दाखल केल्याच्या रागातून पठारवाडीच्या ग्रामस्थांना दमबाजी करण्यात आल्याची फिर्याद पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मात्र कारवाई न झाल्याने गाव बंद ठेउन निषेध सभा घेण्यात आली. आंदोलनात पठारवाडी ग्रामपंचायत, सेवा संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ सहभागी झाले होते.

दमदाटी करणारांविरोधात पोलीस कारवाई न करता त्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप निषेध सभेत करण्यात आला. कारवाई न झाल्यास पारनेर पोलीस ठाण्यासमोर उपोषणास बसण्याचा इशराही देण्यात आला. मा. सरपंच भास्करराव सुपेकर, बाजार समितीचे संचालक किसन सुपेकर, मा. उपसपंच दौलतराव सुपेकर, सुरेखा पठारे, पांडूरंग पठारे, मोहन सुपेकर, कुंडलीक पठारे, किरण सुपेकर, बाळासाहेब पठारे, मंगेश पवार, बाळासाहेब सुपेकर, रामचंद्र महाराज सुपेकर, मोहन पवार, बाबा पठारे, बबनराव पठारे यांनी यावेळी बोलताना घडलेला प्रकार निंदनिय असल्याचे सांगत गायरान लाटण्याचा प्रकार म्हणजे पठारवाडीला लुटण्याचा प्रकार असल्याचे सांगण्यात आले. या लुटीविरोधात एकत्रीतपणे अखेरपर्यंत लढा देण्याचा निर्धार यावेळी एकमुखाने करण्यात आला.



■ गायरान हडपण्याचा प्रयत्न तसेच त्याविरोधात न्यायालयात दाद मागणारांना करण्यात येणाऱ्या दादागिरीच्या निषेधार्थ पठारवाडी येथे बंद पाळण्यात आला.

### अखेरपर्यंत लढा देणार

पठारवाडी गावावर निघोजच्या १४ लोकांनी अन्याय केला असून गायरान जमीन लुटण्याचा प्रयत्न करून त्याविरोधात आवाज उठविणारांना दमदाटी करण्यात येत आहे. आमच्या जीवात जीव असेपर्यंत आम्ही या विरोधात लढा देणार आहोत.

**पांडूरंग पठारे**, न्यायालयीन लढा समितीचे अध्यक्ष

### गावचे वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न

गावाची गायरान जमीन लाटून गावाचे वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न होत असून गावाची एकी दाखवून त्याविरोधात लढा दिला पाहिजे. गुंडा गर्दी करणारे हे लोक एक दिवस आपल्याला गावातून बाहेर काढण्यासही कमी करणार नाहीत.

**रामचंद्र सुपेकर**, मा. प्राचार्य

### निघोज ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडून विरोध

निघोजचे मा. सरपंच स्व. संदीप वराळ यांनी नेहमीच पठारवाडीकरांसाठी सहकार्याची भुमिका ठेवली होती. विकास कामांमध्येही त्यांची मदत असे. सध्याचे ग्रामपंचायत पदाधिकारी सातत्याने पठारवाडीकरांना विरोध करत आहेत. या अन्यायाविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत.

**मोहन सुपेकर**, ग्रामस्थ

### शांतापुर्ण मार्गाने लढून विजय मिळवू

पठारवाडीचा दबदबा जिल्हयात आहे. निघोजचे १४ ग्रामस्थ गायरान लुटण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत. हा प्रकार आम्ही हाणून पाडू. कीतीही दादागिरी करून आवाज दाबण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही शांतापुर्ण मार्गाने लढा सुरू ठेऊ व विजय संपादन करू.

**कुंडलीक पठारे**, युवा नेते

### निघोजची पठारवाडी !

गेल्या पंचवीस वर्षांचा इतिहास पाहिला तर निघोजची पठारवाडी अशी पठारवाडीची ओळख होती. मात्र १४ लोकांनी गायरानावर हक्क सांगून सरकारी जमीन लुटण्याचे षडयंत्र केले आहे. हा प्रकार कदापीही सहन केला जाणार नाही.

**दौलतराव सुपेकर**, मा. उपसपंच

---

# कांद्याला हमीभाव मिळालाच पाहिजे!

### ■ खा. नीलेश लंके यांची संसदेच्या प्रवेशद्वारावर घोषणाबाजी
### ■ इंडिया आघाडीचे खासदार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**कांद्याला हमी भाव मिळालाच पाहिजे, शेतकरी विरोधी सरकारचे करायचे काय खाली डोकं वर पाय अशी घोषणाबाजी करीत खा.नीलेश लंके यांच्यासह इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या प्रवेशद्वारासमोर कांदा तसेच शेतमालाच्या हमीभावासाठी आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधले.**



शेतमालाला हमी भाव मिळालाच पाहिजे, शेतकरी विरोधी सरकारचे करायचे काय , खाली डोकं वर पाय, कांद्याला हमी भाव मिळालाच पाहिजे, किसान विरोधी मोदी सरकार शरम करो, शरम करो, किसान विरोधी मोदी सरकार हाय हाय, कीसान की फसल को एमएसपी दो, किसानपर अन्याय बंद करो अशी आक्रमक घोषणाबाजी करत इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद परिसर दणाणून सोडला होता.

या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदेतील गटनेत्या सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली खा. नीलेश लंके यांनी केले. आंदोलनात माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशिल मोहिते पाटील, दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे गुरूजी, शिवसेनेचे नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे, कॉंग्रेसच्या खासदार रजनी पाटील, शिवसेनेच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी हे सहभागी झाले होते. इंडिया आघाडीचे घटकपक्ष असलेल्या टी डी पी, समाजवादी पार्टीच्या खासदारांनीही या आंदोलनात सहभागी होत शेतकऱ्यांच्या या जिव्हाळयाच्या प्रश्नावर जोरदार घोषणाबाजी केली.

---

# घरकुलांसाठी चार लाखांचा निधी द्या

### खा. नीलेश लंके यांची संसदेत मागणी

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**वाढत्या महागाईचा विचार करता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलांसाठी देण्यात येणार निधी तुटपुंजा असून त्यात सुधारणा करून प्रत्येक घरकुलासाठी चार लाखांचा निधी देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी गुरूवारी संसदेत केली.**

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये काही बदल आवष्यक आहेत. अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा असून




घरकुलांची संख्या अतिशय कमी आहे. महागाईचा विचार करता ग्रामीण व शहरी घरकुलांसाठी देण्यात येणारा निधी अतिशय तुटपुजा आहे. घरकुलासाठी १ लाख २० हजार, शौचालयासाठी १२ हजार तर २६ ते २८ हजार रूपये मनरेगामधून अनुदान असे एकूण १ लाख ५८ हजार ते १ लाख ६० हजार असा निधी मिळतो. मात्र महागाईचा विचार करता एका घरकुलासाठी चार लाख रूपये मिळावेत अशी माझी आग्रही मागणी असल्याचे खा. लंके यांनी नमुद केले.

लंके पुढे म्हणाले, ग्रामीण भागामध्ये घरकुलांसाठी जागा उपलब्ध होत नाही. जागा उपलब्ध झाल्यास त्या जागेचा सात बारा उतारा मिळत नाही. त्यासाठी त्यामध्ये दुरूस्ती करून सर्वसामान्य जनतेला जास्तीत जास्त घरकुले मिळावीत अशी विनंती करत असल्याचे खा. लंके यावेळी बोलताना म्हणाले.

फॅशन | संसार | सौंदर्य

सखी

# पावसाळ्यात नखांची काळजी



**पावसाळा हा बाकी कितीही रम्य असला तरीही त्वचेसाठी तो काहीसा कठोरच असतो. कारण, अर्थात या दिवसांमध्ये बॅक्टेरियल आणि फंगल इन्फेक्शन्सचा धोका तुलनेनं जास्त असतो. त्यामुळे या दिवसांमध्ये आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणं आवश्यक ठरतं. दरम्यान, आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीत खरंतर आपण शक्य तितकी काळजी घेण्याचा प्रयत्न करतच असतो. मात्र, तरीही आपलं एखाद्या लहानशा अवयवाकडे वारंवार दुर्लक्ष होतं. तसेच पावसाळयात शरीराच्या इतर अवयवांप्रमाणेच आपल्या नखांची स्वच्छता टिकवून ठेवणं फार महत्त्वाचं आहे. तसं न केल्यास आपल्याला त्याचे प्रतिकूल परिणाम दिसू शकतात. म्हणूनच पावसाळ्यात नखांची स्वच्छता आणि सौंदर्य हे दोन्ही कसं साधायचं ? याबाबत आज ५ टिप्स जाणून घेणार आहोत...**

- कोरडी ठेवा : आपली नखं ही नेहमी कोरडी राहतील यासाठी विशेष काळजी घ्या. विशेषतः पायांची नखं. पावसाळ्यात आपल्या पायांचा सतत पाण्याशी किंवा अस्वच्छ पाण्याशी संपर्क येत असतो. त्यामुळे ही नखं खराब होण्याची शक्यता अधिक असते. सततच्या दमटपणामुळे या जागी मृत त्वचेच्या पेशी आणि संसर्गजन्य जीवाणू तयार होऊन घाण जमा होते. त्यामुळे, ती जितकी कोरडी राहतील तितकं योग्य. त्याचप्रमाणे, पावसाळ्यात बाहेर पडताना खुले शूज, फ्लोटर्स किंवा चप्पल घाला. घरी परत आल्यावर पाय स्वच्छ धुवून नखं व्यवस्थित कोरडी करा.



- अँटीफंगल पावडर : पावसाळ्यात स्वच्छता राखण्यासाठीच्या अत्यावश्यक गोष्टींमध्ये अँटीफंगल पावडरचा देखील समावेश करा. संसर्ग टाळण्यासाठी दिवसातून एकदा ही पावडर आपल्या नखांवर लावा. अँटीफंगल पावडर नसल्यास त्याऐवजी तुम्ही जेनेरिक टॅल्कम पावडर किंवा स्प्रे डिओडोरंट वापरू शकता.
- ट्रिमिंग : आपली नखं वेळच्यावेळी कापा. कारण लांब नखं ही पाणी आणि आर्द्रतेमुळे सर्व जीवाणूंसाठी एक सुरक्षित जागा बनू शकतात. शिवाय, ओलसरपणामुळे आपली नखं किंचित मऊ देखील होतात. त्यामुळे ती सहज वाकण्याची पर्यायाने मोडण्याची शकता जास्त असते. म्हणून, तुम्ही नख ही लहान आणि सुव्यवस्थित ठेवा.
- स्वच्छतेसाठी टोकदार साधनं टाळा : नखांच्या आतल्या बाजूच्या स्वच्छतेसाठी अनेक स्त्रिया या लांब आणि टोकदार साधनांचा वापर करतात. मात्र, ही एक चुकीची पद्धत आहे. यामुळे तुमची नखं आणि नखांच्या त्वचेमधलं अंतर वाढू शकतं. पावसाळ्यात ओलाव्यामुळे संसर्गाच्या अनेक समस्या उदभवू शकतात. सोबतच तुमच्या नखांच्या त्वचेला इजा होण्याचा देखील धोका आहेच. म्हणूनच टोकदार साधनं न वापरता स्वच्छतेसाठी तुम्ही नेल ब्रश वापरू शकता.
- बेस कोट वापरा : नेल पॉलिश लावण्यापूर्वी बेस कोट वापरा. हा लेअर तुमची नखं कमकुवत होण्यापासून रोखेल. तसेच नेल पॉलिश रिमूव्ह करताना नखं आणि क्यूटिकल्स स्मूथ ठेवण्यासाठी चांगल्या दर्जाचं नेल रिमूव्हर वापरा.

# पावसाळ्यात केसांची काळजी घेणारे ४ तेल



**पावसाळ्यात केस गळणे आणि कोंडा होण्याच्या समस्येने लोक त्रस्त असतात. या ऋतूतील आर्द्रतेमुळे हा त्रासही जास्त वाढतो. आर्द्रतेमुळे लोक केसांना तेल लावणे बंद करतात पण असं मुळीच करू नका. पावसाळा असल्याने केसांना तेल लावणे कधीही थांबवू नका. खरं तर, या ऋतूतही, रोजच्या तेलामुळे तुमचे केस निरोगी आणि फ्रिज-फ्री राहू शकतात. पावसाळ्यात केसांना लावलेले तेल तुमच्या केसांमधील खाज आणि ड्राई स्कैल्पपासून सुटका करते. याशिवाय तुमच्या केसांमधील कोंडा आणि केसगळतीदेखील भरपूर प्रमाणात कमी होते. त्यामुळे पावसाळ्यात देखील केसांना पोषण मिळण्यासाठी तेल लावले पाहिजे. तर जाणून घ्या पावसाळ्यात केसांना कोणते तेल चांगले आहे आणि त्याचा वापर कसा करावा...**

- खोबरेल तेल : खोबरेल तेल तुमच्या केसांसाठी सर्वोत्तम तेलांपैकी एक आहे. त्यात आवश्यक फॅटी ॲसिडस् आणि प्रथिने असतात जे तुमच्या टाळूचे खोलवर जाऊन पोषण करतात आणि तुमचे केस मजबूत करतात. नारळाचे तेल तुम्हाला कोरड्या आणि कुरळ्या केसांचा सामना करण्यास देखील मदत करू शकते, जी पावसाळ्यात एक सामान्य समस्या आहे. याशिवाय खोबरेल तेल तुमचे केस फ्रिज-फ्री देखील ठेवते. यामुळे आठवड्यातून २ वेळा खोबरेल तेल यामुळे या तेलाचा आठवड्यातून २ वेळा तरी केसांना वापर केल्यास, याचा चांगला फायदा मिळतो.
- मोहरीचे तेल : मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने त्वचेवर आणि टाळूवर रक्त प्रवाह सहज वाढतो. केसांवर मोहरीचे तेल वापरावे कारण त्यात अँटीबॅक्टेरियल आणि अँटी फंगल गुणधर्म असतात. यासाठी थोडं मोहरीचं तेल गरम करा आणि त्यानं टाळूला मसाज करा. आपले केस कोमट टॉवेलने काही वेळ झाकून ठेवा आणि थंड पाण्याने धुवा. याने तुमच्या



गरम करून केसांना लावा आणि चांगला मसाज करा.

- ट्री हेअर ऑइल : ट्री हेअर ऑइल पावसाळ्यात केसांना आवश्यक असते. कारण त्यात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. ट्री हेअर ऑइल त्याच्या अँटीव्हायरल गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे, जे तुमच्या त्वचेची आणि केसांची काळजी घेऊ शकते. तसंच हे कोरड्या आणि निर्जीव केसांवर सहज उपचार करते. याशिवाय . ट्री हेअर ऑइल लावल्याने तुमच्या केसांमधील कोंडा किंवा टाळूवरील खाज बऱ्याच प्रमाणात कमी होते.

केसांना नक्कीच चांगले पोषण मिळेल. तसंच केसांसंबंधित समस्याही नाहीशा होतील.

- बदाम तेल : बदामाच्या तेलामध्ये व्हिटॅमिन ई मोठ्या प्रमाणात असते आणि ते त्वचा आणि केसांसाठी देखील खूप चांगले आहे. टाळूवर बदामाचे तेल वापरल्याने केसांचे कूप मजबूत होऊ शकतात. तसंच कोरडे केसांची समस्या बदाम तेलामुळे भरपूर प्रमाणात कमी होते. तुमच्या टाळूची मसाज करण्यासाठी तुम्ही बदामाचे तेल ऑलिव्ह ऑईलमध्ये मिसळून लावू शकता, ज्यामुळे तुमचे केस निरोगी, हायड्रेटेड आणि मऊ होतील.

# ‘अशी’ घ्या केसांची विशेष काळजी !

**पावसाळा ऋतु लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतो. विशेषतः मुलींना या ऋतूचा मनमोकळा आनंद घ्यायचा असतो. पण यासोबतच त्यांना त्यांच्या केसांची आणि त्वचेची चिंता देखील असते. कारण पावसात केस खराब होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. या ऋतूत कमीत कमी हेअर प्रोडक्ट्स वापरा असे तज्ञांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात आपल्या केसांची काळजी कशी घ्यावी याबाबत आपण जाणून घेणार आहोत. पावसाळ्यात केसांच्या होणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय याबाबत जाणून घेऊया...**

## पावसाळ्यात केसांचे संरक्षण कसे करावे ?

- पावसाळ्यात केसांमध्ये कमीत कमी उत्पादनांचा वापर करा. आपले केस स्वच्छ ठेवा आणि केस धुतल्यानंतर कंडिशनर लावा.
- केस धुताना प्रत्येक वेळी कंडिशनर वापरा, पण ते टाळू आणि मुळांना लावण्याऐवजी केसांनाच लावा. यामुळे तुमचे केस गळणार नाही.
- केस रोज धुवा आणि स्वच्छ ठेवा. केस धुतल्यानंतर थोडे कोरडे झाल्यावर सीरम लावा. यामुळे तुमच्या केसांचा ओलावा टिकून राहील आणि केस तुटणार नाहीत.
- रोगप्रतिकारक शक्तीचा केसांवर मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे प्रोटीनयुक्त पदार्थ खा. तसंच अधिक फळे , भाज्या खा आणि भरपूर पाणी प्या.
- पावसाळ्यात केसांना कोमट तेलाने मसाज करा, कारण ते केसांना पोषण देते.
- पावसाळ्यात हेअर ड्रायर वापरणे सहसा टाळा. परंतु, आवश्यक असल्यास फक्त केस कोरडे करा आणि ड्रायर टाळूपासून किमान साडेपाच इंच दूर ठेवून वापरा.
- केसांवर केमिकलयुक्त उत्पादने वापरू नका, म्हणजेच केस सरळ आणि हायलाइट करणे टाळा.
- पावसाळ्यात केस ओले होणार नाहीत याची काळजी घ्या. पावसाच्या



सुरुवातीच्या दिवसांमध्ये पाण्यात , हवेत धूलिकण असतात, ज्यामुळे केस कमकुवत आणि निर्जीव होऊ शकतात.

# पावसाळ्यात केसांना कलर करताना...

**पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण या ऋतूत केस गळणे, कोंडा होणे आणि केसांना फाटे फुटणे या समस्या खूप वाढतात. अशा परिस्थितीत जर तुम्ही या ऋतूत केस कलर करण्याचा विचार करत असाल तर काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. या ऋतूमध्ये केसांना कलर करण्याआधी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. कारण या ऋतूमध्ये केस अधिक खराब होतात. या व्यतिरिक्त या ऋतूमध्ये केसांचा रंगही चांगला चढत नाही. अशा परिस्थितीत केसांना कलर करताना आपण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात हे जाणून घेऊया...**

## या गोष्टी लक्षात ठेवा...

- हेअर कलरच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या : पावसाळ्यात केसांना कलर करण्याआधी तुम्ही निवडत असलेल्या रंगाचा दर्जा चांगला आहे की नाही याकडे लक्ष द्या. यासाठी केसांना कलर लावण्याआधी पॅच टेस्ट करा कारण या कलरच्या वापरामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.
- केस कलर करण्याआधी केसांना तेल लावा : केस कलर करण्याच्या एक ते दोन दिवस आधी केसांना तेलाने चांगले मसाज करा कारण तेल केसांना पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. त्यामुळे केस खराब होत नाहीत आणि कलर केल्यानंतर कोरडेही होत नाहीत. त्याचवेळी, पावसाळ्यात केसांची चमक निघून जाते, त्यामुळे केसांना तेलाने मसाज करणे आवश्यक आहे.
- डोळ्यांना होणाऱ्या नुकसानाकडे लक्ष द्या : पावसाळ्यात त्वचेसोबतच डोळ्यांना संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. अशा परिस्थितीत, संसर्गाच्या वेळी डोळ्यात कलर जाता कामा नये. कारण केसांचा रंग तुमच्या डोळ्यांचा संसर्ग अनेक पटींनी वाढवू शकतो.

# ‘या’ लिपस्टिक शेड्स करा ट्राय !

**पावसाळ्यात आद्रता जास्त असते. त्यामुळे खूप घाम येतो. अशा परिस्थितीत जास्त मेकअप वापरल्यास सुंदर दिसण्याऐवजी तुमचा लूक खराब करू शकतो. पावसाळ्यात हलका मेकअप करणे जास्त चांगले आहे आणि काही विशेष प्रकारच्या लिपस्टीक तुमच्या मेकअप किटमध्ये ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा लिप्स शेड्स बाबत सांगणार आहोत ज्या वापरून तुम्ही पावसाळ्यातही तुमचा लूक चांगला दिसेल...**

- बेरी टोन : पावसाळ्यात बेरीच्या वेगवेगळ्या शेड्स जसे की डीप रेड, प्लम किंवा क्रॅनबेरी असे रंग निवडा. हे शेड्स जवळजवळ प्रत्येक त्वचेच्या टोनला सूट देतात आणि तुमचा लूक सुधारण्यासाठी मदत करतात.
- रोज पिंक : सॉफ्ट रोज पिंक शेड्स तुम्हाला सुंदर दिसण्यासोबतच तरुण दिसण्यासाठी देखील मदत करतात. ते ओठांना नॅचरल लूक देतात, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही त्यांना कॅज्युअल आणि फॉर्मल लूकमध्ये वापरू शकता.
- कोरल शेड : चमकदार कोरल शेड्स पावसाळ्याच्या दिवसामध्ये हटके लूक देण्यासाठी मदत करतात. या रंगामुळे तुम्ही तुमच्या वास्तविक वयापेक्षा तरुण दिसता आणि तुमचे सौंदर्य वाढवतात.
- न्यूड शेड्स : जर तुम्हाला गडद लिपस्टिक वापरणे आवडत नसेल तर तुम्ही न्यूड शेड्स निवडू शकता. न्यूड शेड्सही प्रत्येक आउटफिटसोबत वापरता येतात.
- मोव्ह शेड : गुलाबी आणि जांभळ्या रंगाची शेड असलेली लिपस्टिक ही एक दिवसभरच्या लूकसाठी योग्य पर्याय आहे. बरं, तुम्ही रात्रीच्या पार्टीसाठी किंवा लग्नासाठी या शेड्स वापरून पाहू शकता.



# पावसाळ्यात चेहऱ्यावर मुरूम ?

**पावसाळ्यात त्वचेची खूप काळजी घ्यावी लागते. अन्यथा चेहऱ्यावर अनेक मुरुम येतात किंवा चेहरा खूप तेलकट दिसू लागतो. त्वचेची योग्य काळजी घेऊनही चेहऱ्यावर मुरुम येतात. याचा अर्थ तुम्ही काळजी घेताना कुठेतरी चुकत आहात. ज्यामुळे चेहऱ्यावर मुरुम येण काही थांबत नाही. अशावेळी तुम्ही त्वचेची काळजी घेताना कुठे चुकत आहात आणि मुरुपांपासून कशी मुक्तता मिळवायची जाणून घ्या...**

- त्वचेवर चुकीचे केअर प्रोडक्ट्स वापरणे : स्कीन केअर प्रोडक्ट वापरण्यापूर्वी, आपली त्वचा तेलकट, कोरडी किंवा सामान्य यापैकी कोणती आहे हे नीट तपासून घ्या. जर तुम्ही त्वचेनुसार चुकीचे स्कीन प्रोडक्ट वापरत असाल तर तुमची त्वचा खराब होऊ शकते. तसेच चेहऱ्यावर मुरुम येऊ लागतात.



- हानिकारक मेकअप प्रोडक्ट वापरणे : मेकअप प्रोडक्ट चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी वापरले जातात. पण मेकअपचे अनेक प्रोडक्ट बाजारात आहेत ज्यामध्ये केमिकलचे प्रमाण खूप जास्त असते. यामुळे चेहऱ्यावर बराच वेळ मेकअप ठेवल्याने योग्य ऑक्सिजन मिळत नाही यामुळेही चेहऱ्यावर मुरुम येतात.
- चेहऱ्यावर चुकीचे क्लींझर वापरणे : चेहऱ्याच्या त्वचेनुसार योग्य क्लींझरची निवड करणे देखील खूप महत्वाचे आहे, अन्यथा चेहऱ्याची त्वचा खराब होऊ शकते. तुम्ही फोम क्लींझर वापरू नका, तसेच स्किन एक्सफोलिएट करण्यासाठी क्लींझर वापरू नये. असे केल्याने त्वचेला भोगा पडण्यास सुरुवात होते. जर तुम्हाला सर्वोत्तम परिणाम मिळवायचा असेल, तर फक्त वॉटर बेस्ड क्लींझर लावा.
- फक्त वाइप्सच्या मदतीने मेकअप काढा : चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी वाइप्सचा वापर करा, पण त्यानंतर चेहरा स्वच्छ करण्यासाठी तुम्ही फेसवॉश वापरू शकता. कारण यामुळे चेहऱ्यावरील सर्व प्रकारचे केमिकल्स निघून जातील.

## शॉर्ट न्यूज

### धाडस करतो तोच इतिहास घडवतो

■ **कोपरगाव :** नवउद्योजकांनी व्यवसायातील संधी शोधुन स्वतः बरोबरच परिसराची प्रगती करावी, युवकांनी सामाजिक बदल लक्षात घेऊन काळासोबत पावले टाकल्यास राष्ट्र अधिक बलशाली होईल यासाठी प्रगतीच्या नवीन संधीचे सोने करावे. जो धाडस करतो तो आपल्या कार्याने इतिहास घडवून उज्वल भविष्याची वाट देखील रेखाटतो असे प्रतिपादन चेअरमन विवेक कोल्हे यांनी केले. कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहतीत उद्योजक सुहास व संदिप सदाफळ यांनी एस. पी. पी फार्मा या नविन युनिटचा शुभारंभ विवेक कोल्हे यांच्या हस्ते झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

### श्रीरामपुरात गावरान कांदा ३००० रुपये

■ **श्रीरामपूर :** बाजार समितीत कांद्याची आवक सुरू आहे.लिलावात कांद्याला ३००० रुपये दर मिळाला. श्रीरामपूर बाजार समितीत काल गावरान कांद्याच्या २० हजार ७२३ गोण्यांची आवक झाली असून गावरान कांद्याला सुरुवातीच्या ३०० गोण्यांना ३००० रुपये तर अन्य गोण्यांना २८०० रुपये तर लूज कांद्याला २६७० रुपये इतका भाव मिळाला आहे. श्रीरामपूर बाजार समितीत एक नंबर कांदा २४०० ते २८००, दोन नंबर कांदा १९०० ते २३५०, तीन नंबर कांदा १००० ते १८५० तर गोल्टीला २२०० ते २६००, खादीला ३०० ते ९५० रुपये इतका भाव मिळाला आहे.

### जुगार अड्ड्यावर पोलिस पथकाचा छापा.

■ **राहुरी :** येथील पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गुप्त खबऱ्या मार्फत माहीती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने तालुक्यातील वांबोरी गावचे शिवारात जगदंबा माता मंदीरासमोर छापा टाकला. त्यावेळी तेथे एका झाडाखाली काही इसम तिरट नावाचा जुगार पैशावर खेळताना मिळुन आले. पोलिस पथकाने फिरोज अनिस शेख, शंकर हरिचंद्र कुसमुडे, किरण दिलीप नारायने, संजय भाउसाहेब सातपुते, सर्व रा. वांबोरी ता. राहुरी, यांना ताब्यात घेऊन कारवाई केली. तसेच जुगार खेळण्याचे साहित्य व काही रोख रक्कम जप्त केली.आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला.

### लाखो भाविकांनी समाधी स्थळाचे दर्शन घेतले

■ **ताहाराबाद :** श्री संत कवी महिपती महाराजांच्या जयघोषात प्रतिपंढरी समजल्या जाणाऱ्या राहुरी तालुक्यातील श्रीक्षेत्र ताहाराबाद येथील पांडुरंग उत्सवाची काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या पांडुरंग उत्सवातील वैष्णवांचा मेळा काल्याच्या कीर्तनानंतर मार्गस्थ झाला. लांखो भाविकांनी हजेरी लावून समाधी स्थळाचे दर्शन घेतले. वै. सद्गुरू नाना महाराज वनकुटेकर सोबलेवाडी ता. पारनेर ते श्रीक्षेत्र ताहाराबाद पायी दिंडी सोहळ्याच्या फडावर बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे काल्याचे कीर्तन झाले.

### सॅफ्रॉन लायन्स बिझनेस नेटवर्कची स्थापना

■ **संगमनेर :** येथील उद्योजक गिरीश मालपाणी यांच्या संकल्पनेतून सॅफ्रॉन लायन्स बिझनेस नेटवर्कची स्थापना करण्यात आली. सॅफ्रॉन लायन्स बिझनेस नेटवर्कच्या अंतर्गत उद्योजकांना आपला व्यवसाय सर्वांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. या बिजनेस ग्रुपच्या माध्यमातून उद्योगाची वृध्दी व्हावी हा हेतू आहे. सॅफ्रॉन लायन्स बिझनेस नेटवर्कच्या अध्यक्षपदी श्रीनिवास भंडारी, उपाध्यक्षपदी श्रीहरी नावंदर, सेक्रेटरीपदी प्रशांत गुंजाळ तर खजिनदारपदी मिलींद पलोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

# डॉ.विखे पाटील फौंडेशनच्या वतीने स्तनपान सप्ताहानिमित्त जनजागृती उपक्रम

## प्रश्नमंजूषा कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद




**नगर : प्रतिनिधी**

**डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगच्या वतीने जागतिक स्तनपान सप्ताहा निमित्त अंतर कमी करणे: सर्वांसाठी स्तनपान समर्थनया विषयावर आयोजित पथनाट्य आयोजित करून जनजागृती करण्यात आली.**

वडगाव गुप्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये वडगाव गुप्ता गावचे सरपंच मा.विजयराव शेवाळे यांनी विशेष सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. तसेच कॉलेज ऑफ नर्सिंग मध्ये जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. यात जिल्ह्यातील विविध कॉलेजमधील विद्यार्थांनी आपला सहभाग नोंदवला.या स्पर्धेमध्ये सर्व सहभागी कॉलेजमधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व विजेत्या कॉलेजला प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले तसेच त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमामध्ये डॉ.निखील डोखे, श्रीमती. कविता भोकनळ यांनी प्रश्नमंजुषेचे मूल्यमापन केले. प्रश्नमंजुषेमध्ये डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थीनीं प्रथम क्रमांक तर श्रीमती. सिंधुताई एकनाथराव विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, लोणी येथील विद्यार्थीनीं दुसरा क्रमांक, सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपूर येथील मुलींनी तृतीय क्रमांक मिळवला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.प्रतिभा चांदेकर, उपप्राचार्य डॉ.योगिता औताडे, श्री.अमोल अनाप, श्री.प्रशांत अंम्ब्रित यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री माझीलाडकी बहीण योजना

# शिरुर तालुक्यातून ५७ हजार २८७ अर्ज!

**शिरुर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरीता शिरुर तालुक्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी ५७ हजार २८७ अर्ज सादर केले आहेत.**



### कारेगांवमध्ये सर्वाधिक २,१५८ अर्ज सादर !

**मुख्यमंत्री माझीलाडकी बहीण योजनेसाठी तालुक्यातील कारेगाव येथून महिलांनी सर्वाधिक २,१५८ अर्ज सादर केले आहेत. यासर्व लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपयांप्रमाणे एकूण ३२,३७००० रूपये मिळतील. अर्ज भरतांना महिलांना अर्थिक भुर्दंड बसू नये तसेच फसवणूक टाळण्यासाठी याठिकाणी ग्रामपंचायतीच्या वतीने महिलांसाठी अर्ज भरण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, आरोग्य, पोषणात सुधारणा करण्यासाठी तसेच कुटुंबातील महिलांची निर्णायक भुमिका मजबूत करण्यासाठी सरकारने मुख्यमंत्री माझीलाडकी बहीण योजना सुरु केली आहे. अर्ज दुरूस्तीसाठी पुन्हा सादर करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. त्रुटी असलेल्या अर्जांबाबत संबंधित महिलांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे कळविण्यात येत असून त्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता करून कागदपत्रे सादर करावे तसेच उर्वरित पात्र महिलांनी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्जदार महिलामहाराष्ट्रराज्याची रहिवाशी असावी. विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला योजनेसाठी पात्र असेल. वयाची किमान २१ वर्षे पूर्ण व कमाल ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत योजनेसाठी पात्र असेल. लाभार्थ्याचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असावे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे.

# कला केंद्रामधील डीजेवर बंदी घालावी

## लोकनाट्य कलाकार संघटनेची मागणी




**नगर : प्रतिनिधी**

**डीजेमुळे कला केंद्रातील कलावंतांवर उपासमारीची वेळ आली असताना, कला केंद्रातील डीजे साऊंड सिस्टीमवर बंदी घालण्याची मागणी अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व अप्पर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे यांची भेट घेऊन निवेदन दिले. कलाकेंद्र सांस्कृतिक कलेच्या नावाखाली सर्रास डान्सबार बनल्याचा आरोप त्यांना केला आहे.**

आरपीआयचे (आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, लावणी सम्राज्ञी सुरेखाताई पुणेकर, कबड्डी असोसिएशनचे जामखेड तालुकाध्यक्ष लक्ष्मण ढेपे, संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव भीमराव काळोखे, कार्याध्यक्ष शिवाजी जावळेकर, महिला उपाध्यक्षा शोभा लाखे आदींसह जिल्ह्यासह जामखेड तालुक्यातील कलाकार यावेळी उपस्थित होते.

जामखेड येथे ९ कला केंद्र असून, सांस्कृतिक कलेच्या नावाखाली ते सर्रास डान्सबार बनले आहेत. कला केंद्रात लावण्यात आलेल्या डीजे सिस्टीमने कलाकारांच्या हाताला काम राहिले नाही. परिणामी त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. पेटी, ढोलकी, तबला वादक, गायक आदी कलाकारांना काम नाही. कला केंद्रात महाराष्ट्राची संस्कृती जपणारी मराठमोळी लावणी व लोकनाट्य असायचे, मात्र लोकनाट्य, संस्कृती कला केंद्राच्या नावाखाली सर्रास डान्सबार सुरू झाले आहेत. यापूर्वी दोन वेळा पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन देण्यात आले असून, त्याची कसलीही दखल घेतलेली नाही. हा प्रकार न थांबल्यास सर्व कलाकार जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने दिला आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

## वाचकांच्या लेखणीतून

# बांगला देशातील उद्रेक

बांगला देशात राजकीय उलथापालथ चालली आहे. ही त्या देशाची अंतर्गत बाब आहे असे समजता येणार नाही. बांगला देशाच्या निर्मितीत आपल्या देशाचा महत्त्वाचा हात होता. शेख मुजिबूर रहमान यांच्या कन्या शेख हसीना आपल्या देशाचे पंतप्रधानपद सोडून तूर्तास भारताच्या आसऱ्याला आलेल्या आहेत. त्यांच्या आवामी लिग पक्षाचे सरकार बरखास्त झालेले आहे. येथे आता बांगला देश नॅशनॅलिस्ट पक्षाचे सरकार सत्तेवर येण्याची दाट शक्यता दिसत आहे. या पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यास कट्टरपंथीयांना उत्तेजना मिळेल. जमाते इस्लामीसमान दहशतवादी संघटनांच्या कारवायांचा उद्रेक होईल. शेख हसीना यांच्यामुळेच बांगला देशात शांतता नांदत होती. त्यांच्या काळात भारत-बांगला देश संबंध सलोख्याचे राहिले.



पण आता तरुणांमध्ये बेरोजगारीचा प्रश्न उद्भवल्यामुळे तेथे राजकीय उलथापालथ होऊन राहिली आहे. हे वरकरणी खरे असले तरी आतली मेख वेगळीच आहे. पाकिस्तान, चीन यांचा या राजकीय उलथापालथीत मोठा हात असल्याचा दाट संशय आहे. भारत-बांगला देश त्यांतले सलोख्याचे संबंध या दोन देशांच्या डोळ्यांमध्ये सलत होते. यात अमेरिका आणि चीन भविष्यातील आपला राखीव लष्करी तळ म्हणून बांगला देशावर नजर ठेऊन आहेत. त्यासाठी त्यांचाही बांगला देशाच्या राजकीय उलथापालथीत हस्तक्षेप नाकारता येत नाही. राखीव जागा आणि बेरोजगारीचा प्रश्न योग्य रीतीने हाताळण्यात शेख हसीना अपयशी ठरल्या असे जाणकार राजकीय उलथापालथीचे तात्कालिक कारण ( ) व्यक्त करीत आहेत. ते काहीही असले तरी झाले ते विपरीत आणि अनिष्ट झाले आहे.
बांगला देशासारखा आपला शेजारी देश राजकीय, सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या अस्थिर राहणे आपल्याला परवडणारे नाही. झुंडशाही आणि गुंडशाही लोकशाही राष्ट्राला पोषक नसून दूषक असते. ते काहीही असले तरी बांगला देशात जे झाले ते विपरीत आणि अनिष्ट झाले आहे, हे खरे.
आपले शेजारी राष्ट्र दुश्मन जरी असले तरी ते खस्ताहाल नसावे, अशी आपली भावना असली पाहिजे. म्हणूनच २९ फेब्रुवारी २०२४ च्या पारनेर दर्शनच्या अंकात मी पाकिस्तान खस्ताहाल नसावा या मथळ्याचा एक लेखही लिहिला होता. बांगला देश, आपला शेजारी देश, आपले मित्रराष्ट्र आपल्या आंतरिक संकटातून मुक्त व्हावे, अशी आशा बाळगणे अनाठायी होणार नाही.

**सब्र कर मेरे दोस्त मुसीबत के दिन भी गुज़र जाएंगे।**
**देखना, हंसी उड़ाने वालों के भी चेहरे उतर जाएंगे।।**

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# आंबेगावात जमीन सात फूट खचली

**आंबेगाव : प्रतिनिधी**

**गेल्या १० वर्षांपूर्वी माळीण दुर्घटनेनं संपूर्ण जगाला हादरवले होते. संपूर्ण डोंगराचे भूस्खलन होऊन आंबेगाव तालुक्यातील माळीन हे गाव जमिनीत गाडले गेले होते. त्या घटनेच्या आठवणी ताज्या असतानाच आता माळीण गाव परिसरातील गावांना धोका निर्माण झाला आहे. माळीण परिसरात असलेले पांचाळे खुर्द या गावामध्ये सात ते आठ फूट जमीन खाली गाडली गेली आहे. त्यामुळे या भागामध्ये माळीण घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे आमचे पुनर्वसन करावे, अशी मागणी या गावातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.**



आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागामध्ये असलेले पांचाळे खुर्द हे गाव. डिंभे धरणाच्या बॅक वॉटरजवळ हे गाव आहे. तसेच माळीण गावाच्या देखील अगदी लगत हे गाव आहे. दोन दिवसांपूर्वी या गावातील जमीन गुडघाभर खाली खचली गेली आहे. या गावांमध्ये जवळपास ४५ हून अधिक कुटुंब वास्तव्यास आहेत. जमीन खसली गेल्याने या गावातील ग्रामस्थ भयभीत झाली आहेत.

गेल्या काही दिवसांपासून या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने भूस्खलनाची मोठी भीती निर्माण झाली आहे. याबाबत नागरिकांनी अनेकदा मागणी करूनही प्रशासनाकडून कोणतेही दखल घेतली जात नाहीये. आपत्ती व्यवस्थापनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. भविष्यात जर माळीणसारखी दुर्घटना घडली आणि आमचे संपूर्ण गाव जर भूस्खलनात गाडले गेले. तर याला जबाबदार कोण? असा सवाल येथील नागरिक विचारत आहेत. जमीन मोठ्या प्रमाणावर खचल्याने येथील नागरिकांना जीव मोठे धरून राहावे लागत आहे. त्यामुळे आमचे लवकरात लवकर पुनर्वसन करा, अशी मागणी येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतला नागेश्वर मंदिराचा इतिहास

**■ पारनेर पब्लिक स्कुलची क्षेत्र भेट ■ मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियानांतर्गत उपक्रम**

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या शहरातील श्री नागेश्वर मंदिरास पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन मंदिराचा पौराणीक इतिहास जाणून घेतला. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमांतर्गत या क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते.**



■ क्षेत्र भेटीअंतर्गत पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी पारनेर शहरातील श्री नागेश्वर मंदिरास भेट देऊन माहीती घेतली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातही पारनेर पब्लिक स्कुलने सहभाग नोंदविला असून या उपक्रमांतर्गत या क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी या क्षेत्र भेटीत सहभाग नोंदविला.

पुरातन मंदिराचा जिर्णोध्दार केल्यामुळे त्याचे मुळ सौंदर्य हरवले असले तरी पुर्वभिमुख मुख्य मंडप, सभामंडप, गर्भगृह अशी या मंदीराची रचना आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर चौकटीत महिषासुमर्दिनीचे शिल्प व सभा मंडपात श्री गणेशाच्या तीन सुरेख मुर्त्या आहेत. मंदीराच्या समोर छोटयाशा चौथ्यावर नंदीव नंदीशेजारी नाग शिल्पे दिसून येतात. डाव्या बाजूस पुरातन बारव व मंदीराशेजारी पेशवेकालीन श्रीराम मंदिर आहे. असा ऐतिहासिक पार्श्व इतिहास लाभलेले पारनेर शहरातील नागेश्वर मंदीर स्थानिक वारसा भाविकांप्रमाणे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जपावा या भावनेतून विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. असे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले. या क्षेत्र भेटीतून नागेश्वर मंदीराची पार्श्वभुमी समजावून सांगितली गेली. या भेटीप्रसंगी विद्यालयाचे पुंड व मापारी हे शिक्षक उपस्थित होते.

### बारा ज्योर्तीलिंगांपैकी एक मंदिर

**ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पारनेर शहराचे नाव पाराशर ऋषींच्या नावावरून पडले आहे. पाराशरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या शहरात महादेवाची बारा ज्योतिर्लिंग आहेत. त्यापैकी एक म्हणजे शहराच्या नागेश्वर गल्लीतील नागेश्वर मंदिर होय.**

**गिताराम म्हस्के**

# पवार यांच्याविरोधात खोटी फिर्याद दिल्याची तक्रार

**गौरव पवार यांचे पोलीस निरीक्षकांना निवेदन**

निघोज : प्रतिनिधी

**सुनील रघुनाथ पवार हे मुंबई जिल्हा बँकेत अधिकारी म्हणून काम पाहत असून ते आपल्या कर्तव्यावर असतानाही त्यांच्या विरोधात दमदाटी केल्याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात खोटी फिर्याद दिल्याची तक्रार पवार यांचे भाऊ अक्षय पवार यांनी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

पठारवाडी येथील गायरान जमीन तसेच स्टोन क्रशरसंदर्भात पठारवाडी व निघोज येथील काही ग्रामस्थांमध्ये वाद असून त्या अनुषंगाने अनिल भाऊ सुपेकर, पांडूरंग सदाशिव पठारे, मोहन बबन पवार व मंगेश भास्कर पवार यांनी ज्ञानेश्वर वरखडे व सुनील पवार यांनी मंगळवार दि. ६ ऑगस्ट रोजी निघोज ग्रामपंचायत कार्यालयासमोर दमदाटी केल्यासंदर्भात पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

अनिल सुपेकर व इतरांनी दिलेली फिर्याद खोटी असल्याचे स्पष्ट करून




त्रास देण्याच्या हेतूने त्यांच्या विरोधात फिर्याद देऊन बदनामी केल्याचे पवार यांचे म्हणणे आहे. पवार यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या खोटया फिर्यादीची चौकशी करून संबंधितांवर

### दमबाजी केली नाही

**पठारवाडीच्या ग्रामस्थांना आपण दमबाजी केलेली नाही. ग्रामस्थांची व आपली भेट झाली त्यावेळी स्टोन क्रशरला विरोध करून आमच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होऊ नये अशी विनंती आपण त्यांना केली. आपल्यासोबत कोणीही नव्हते. तरीही मुंबईमध्ये बँकेत असलेल्या सुनील पवार यांचेही नाव त्यासोबत जोडण्यात आले.**

**ज्ञानेश्वर वरखडे**
**उपसरपंच, निघोज**

गौरव पवार यांनी निवेदनात नमुद केले आहे की, सुनील पवार हे दि.६ रोजी मुंबई येथे बँकेत होते. त्यांच्या पुराव्यादाखल पवार यांनी बँकेच्या हजेरी रजिष्टरची छाया प्रतही पोलीस प्रशासनास सादर केली आहे. असे असतानाही जाणीवपूर्वक कठोर कारवाई करण्यात यावी. कारवाई न झाल्यास कुटूंबियांसमवेत तसेच ग्रामस्थांसह निघोज बस स्थानक परिसरात आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

# विजय पवार सुपा सोसायटीचे व्हाईस चेअरमन बिनविरोध निवड ; मान्यवरांकडून अभिनंदन



■ विजय पवार यांनी सुपा सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांनी सत्कार केला.

सुपा : प्रतिनिधी

**सुपा येथील श्रीमंत विश्वासराव बहादुर विकास सेवा सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी विजय दिलीप पवार यांची बिनविरोध निवड झाली. पवार यांच्या निवडीबद्दल विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.**

सेवा सोसायटीच्या उपाध्यक्षपदाची निवड करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत टी. एस. भोसले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. सचिव मंगेश देशमुख यांनी त्यांना सहहाय केले. उपाध्यक्षपदासाठी विजय पवार यांचे नाव एकमताने सुचविण्यात आल्यानंतर त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी भोसले यांनी जाहिर केले.

निवडीनंतर बोलताना पवार म्हणाले, सेवा संस्थेच्या माध्यमातून सभासद शेतकरी बांधवांसाठीच्या विविध योजना परिणामकारकरित्या राबविण्यात येतील. जिल्हा बँकेमार्फत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

पवार यांच्या निवडीबद्दल दुध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार, उद्योजक योगेश रोकडे, चेअरमन दिलीपराव पवार, खरेदी विक्री संघाचे संचालक सुनील पवार, माजी सरपंच बाळासाहेब पवार, मनसे नेते अविनाश पवार, सेवा संस्थेचे संचालक राहुल पवार, दादा जाधव, अशोक येणारे, पांडूरंग येणारे, बाळासाहेब कोल्हे, पंकज पवार, रमेश गांधी यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी बोलताना उद्योजक योगेश रोकडे यांनी सांगितले की, विजय पवार यांच्यासारख्या तरूण कार्यकर्त्याला व्हाईस चेअरमनपदाची संधी दिली ही आनंदाची बाब आहे. पवार यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून इतर तरूणांना प्रेरणादायी काम करावे. संस्थेच्या माध्यमातून सभासद शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देत आपली निवड सार्थ ठरवावी असे आवाहन रोकडे यांनी केले.

# बाभुळवाडे येथील केदारेश्वर उत्सवासाची तयारी पूर्ण

**केदारेश्वर डोंगरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन**

बाभुळवाडा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील केदारेश्वर सेवाभावी ट्रस्ट व समस्त बाभूळवाडे ग्रामस्थ यांच्या वतीने गावातील ग्रामदैवत स्वयंभू श्री केदारेश्वर डोंगरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

यावर्षी श्रावण मासात पाच सोमवार आले असून श्रावण मासाची सुरुवात व शेवट ही सोमवारने होत आहे व हा योगायोग तब्बल ७१ वर्षानंतर आला आहे. केदारेश्वर सेवाभावी ट्रस्ट गेल्या १३ वर्षांपासून विविध विकास कामे करत आहे. ट्रस्टमार्फत होत असलेल्या कामांमुळे अनेक भाविक व दानशूर व्यक्ती प्रभावित होत असून देवस्थानला सढळ हाताने मदत करण्यासाठी पुढे येत आहेत. याच अनुषंगाने गावातीलच पाठक कुटुंबीयांतील श्रीम. रेणुका व आदित्य पाठक पुढे आले आले व त्यांनी स्व. जगन्नाथ पाठक गुरुजी यांच्या स्मरणार्थ केदारेश्वर डोंगरावर १३ फुटी भव्य असे केदारेश्वरांचे ध्यानस्थ शिल्प उभे केले आहे. तसेच गारगुंडी येथील सुनील शंकर फापाळे यांनी आपले स्वर्गीय आई-वडील शंकर आनंदा फापाळे व शांताबाई शंकर फापाळे यांच्या स्मरणार्थ मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार व दोन्ही शिव मंदिरांच्या प्रवेशद्वारावर डिजिटल नाम फलक तसेच येणाऱ्या भाविकांसाठी शुद्ध व थंड पाण्याचे संयंत्र याची व्यवस्था उभी केली आहे.

हत्तलखिंडी येथील भाविक भक्त सुभाषशेठ



गायकवाड व सौ. साधनाताई यांनी स्व. सत्यभामा जगदाळे यांच्या स्मरणार्थ भव्य असे रंगीत पाण्याचे कारंजे उभे करण्यासाठी आर्थिक सहयोग दिला आहे. प्रथम श्रावणी सोमवारचे औचित्य साधून या सर्व थोर देणगीदारांचा, सोमवारच्या अन्नदात्यांचा व दानशूर व्यक्तिमत्त्वांचा केदारेश्वर सेवाभावी ट्रस्ट व बाभूळवाडे ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी केदारेश्वर सेवाभावी ट्रस्टचे सर्व विश्वस्त, ग्रामपंचायत सरपंच सौ वैशाली जगदाळे व सर्व सदस्य विकास सोसायटी चेअरमन श्री जयसिंग खणकर व सर्व सदस्य, केदारेश्वर पतसंस्था व रामलिंग पतसंस्थांचे सर्व कर्मचारी, सर्व जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक व विद्यार्थी तसेच केदारेश्वर हायस्कूलचे सर्व शिक्षक व विद्यार्थी, भाजप कार्यकारिणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, खासदार नीलेश लंके यांचे स्विय सहाय्यक संदीप चौधरी, नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी अनिल गंधाक्ते, महेंद्र गायकवाड तसेच ग्राहक पंचायतचे विलास जगदाळे, हरिश्चंद्र पोटे, कचर खणकर, अनंथा मातेरे, सचिव भिकाजी जगदाळे सर, संजय शिर्के सर, पांडुरंग पवार सर, निवृत्ती जगदाळे, भाऊ खोडदे, सोपान जगदाळे, सुभाष जगदाळे, सविता जगदाळे, लक्ष्मीबाई बोरूडे, प्रमोद जगदाळे सर्व थोर देणगीदार मंडळी व बाभूळवाडे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व भाविकांसाठी जगदाळे वाडा व पिराणी वस्ती कडून खिचडी प्रसाद व सायंकाळी सोमवारचे अन्नदाते श्री ज्ञानदेव चौगुले व परिवाराकडून लापशी-भात-आमटीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक श्रावणी सोमवारी केदारेश्वर डोंगर स्थानावर कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच, उपसरपंच तसेच देवस्थानचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ तसेच भिकाजी जगदाळे सर यांनी केले आहे.

**केदारेश्वर देवस्थान हे डोंगरावर असून गावकऱ्यांनी व मुंबई,पुणे येथील गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात एकत्र येऊन या ठिकाणी विकासकामे करीत देवस्थान विकास केला असून हा परिसर निसर्गरम्य असल्याने लक्षवेधी झाला असून या ठिकाणी राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून विकासकामे करण्याची संधी असून सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली आहे.**

# कार्यक्षम सरपंच म्हणून चित्रा वराळ यांची ओळख!

**तंटामुक्तीचे अध्यक्ष मंगेश लाळगे यांचे प्रतिपादन**



निघोज : प्रतिनिधी

**सचिन वराळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघोज ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच म्हणून काम करताना साडेतीन वर्षात मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावून चित्रा वराळ यांनी कार्यक्षम सरपंच म्हणून ओळख निर्माण केल्याचे पतिपादन तंटामुक्तीचे अध्यक्ष मंगेश लाळगे यांनी केले.**

सरपंच वराळ यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ तसेच ग्रामस्थ यांच्या वतीने पत्रकार संतोष इधाटे व भास्करराव कवाद यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी लाळगे हे बोलत होते. यावेळी भिमराव लामखडे, दत्ताजी उनवणे, जयसिंग हरेल, रवि लाळगे हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना लाळगे म्हणाले, मा. सरपंच व बाजार समितीचे मा. उपसभापती संदीप वराळ पाटील यांनी निघेज आणि परिसरात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या माध्यमातून मोठी विकास कामे मार्गी लावली. त्यांचेच अनुकरण करीत सचिन वराळ यांनी जनतेशी संपर्क ठेऊन विकास कामे मार्गी लावली आहे. सरपंच चित्राताई वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी साडेतीन वर्षाच्या कालखंडात नियोजनबध्द विकास कामे करून गावाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी योगदान दिल्याचे लाळगे म्हणाले.

ग्रामपंचायतीचे मा. सदस्य भिमराव लामखडे यांनीही वराळ यांनी केलेल्या विकास कामांचे कौतुक केले. केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध योजना प्रभाविपणे राबविण्यात यश आल्याचे नमुद करतानाच आगामी काळात राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर येउन विकास कामांची ही मालिका अशी सुरू राहील असा विश्वास लामखडे यांनी व्यक्त केला. जयसिंग हरेल यांनी सुत्रसंचलन तर भास्करराव कवाद यांनी आभार मानले.

# सावरगावची प्रलंबित विकास कामे मार्गी लावू

**खासदार नीलेश लंके यांची ग्वाही । रवींद्र गायखे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा**

सावरगाव : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून सावरगावकरांनी मोठं मताधिक्य दिले सर्व ग्रामस्थांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत. यापुढील काळात काम करत असताना सावरगावचा राहिलेला प्रलंबित विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी प्रयत्न करणार आहे असे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले. सावरगाव येथे कार्यक्रमानिमित्ताने ते बोलत होते.**



खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत सावरगाव ग्रामपंचायत सदस्य राष्ट्रवादी जिल्हा युवकचे उपाध्यक्ष रवींद्र गायखे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून सावरगाव काळेवाडी येथे साजरा करण्यात आला.

गायखे यांच्या वाढदिवसानिमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसाच्या औचित्य साधत दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी मा.जिल्हा परिषद सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या उपस्थितीत वृद्धांना काठी वाटप, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, वृक्षारोपण व स्थानिक रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले तसेच संध्याकाळी ह. भ. प. कविराज महाराज झावरे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत रवींद्र गायके यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती गंगाराम बेलकर, शिवाजी बेलकर, अशोक घुले, बाजार समितीचे उपसभापती बापू शिर्के, सरपंच प्रकाश गाजरे, ज्येष्ठ नेते रामभाऊ थोरात, दत्तात्रय निवडुंगे, किरण ठुबे, अमोल उगले, उपसरपंच रामभाऊ तराळ, राजेंद्र आहेर, शिवाजी भोसले, जिजाभाऊ चिकणे, सचिन गोडसे, शशी आंधळे, बाळासाहेब खिलारी, गणेश गायखे, नवनाथ राळे, रवींद्र राजदेव, संतोष हांडे, बापू ठुबे, दौलत गांगड, सचिन काळे, गणेश भोसले, बाळशिराम गायखे, राजेंद्र जगताप, रणधीर शिंदे, प्रमोद गुगळे, विजय चिकणे, साहेबराव चिकणे, बाळासाहेब भोसले, मुकुंद कळमकर, बाबाजी लांडगे, बबलू झावरे, सरपंच प्रकाश राठोड, सरपंच संजय रोकडे, कुंडलिक शेळके, इंद्रभान माने, प्रसाद नवले, बाबाजी कळमकर, विठ्ठल माने, अनिल चौधरी, अशोक आगळे, रामदास मगर, बाळासाहेब बेलकर, विठ्ठल गायखे, हरीश साळवे, रामदास साळवे, आदी सावरगाव येथील ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नव्या जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घालून सुजित पाटील विधानसभेच्या रिंगणात उतरणार

**■ विकासकामे व सर्वपक्षीयांशी संबंध हिच ताकद**
**■ सामाजिक कार्यकर्ते किसनराव धुमाळ यांची माहिती**

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**सध्या विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून पारनेर नगर विधानसभा मतदारसंघामध्ये सुजित झावरे पाटील निवडणुकीच्या दृष्टीने सक्रिय झाले असून त्यांनी गाठीभेटी घ्यायला सुरुवात केली आहे. नव्या जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घालून ही निवडणूक सुजित झावरे लढणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते किसनराव धुमाळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.**

सुजित झावरे पाटील ही निवडणूक विकास कामांच्या जोरावरच लढणारा असून स्वर्गीय आमदार वसंतराव झावरे पाटील व सुजित झावरे पाटील यांनी तालुक्यात अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत. त्यामुळे ही निवडणूक विकासावरती लढली जावी अशीच सर्वसामान्य जनतेची इच्छा आहे. असेही यावेळी धुमाळ यांनी सांगितले.

सुजित झावरे पाटील यांनी खऱ्या अर्थाने सर्वपक्षीय कार्यकर्त्यांशी तालुक्यांमध्ये सुसंवाद ठेवला आहे. त्यामुळे त्यांना ही निवडणूक सोपी असल्याचे आता मानले जात असून त्यांच्यासाठी विधानसभा मतदारसंघामध्ये पोषक निवडणुकीसाठी वातावरण आहे. पारनेर तालुक्यातील युवा वर्गामध्ये त्यांचं मुख्य आकर्षण आहे आणि ते विशेष लोकप्रिय असल्याने युवकांचे मोठे संघटन त्यांच्या पाठीमागे उभे असल्याचेही यावेळी सामाजिक कार्यकर्ते किसन धुमाळ यांनी सांगितले आहे.





यावेळी बोलताना निवडणुकीमध्ये सुजित झावरे पाटील यांनी सर्वांना सोबत घेऊन व सर्वांना विश्वासात घेऊन निवडणुकीला सामोरे जावे असे मत माजी सभापती अरुणराव ठाणगे ,माजी सरपंच संतोष जाधव, सामाजिक कार्यकर्ते किसनराव धुमाळ, भास्करराव शिंदे, अश्विन मंचरे आदी कार्यकर्त्यांनी यावेळी सांगितले.

### झावरे यांच्या रूपाने तालुक्यात सक्षम पर्याय

**तालुक्यात विकास कामांच्या माध्यमातून राजकारण करणारे नेतृत्व म्हणून सुजित जावरे पाटील यांच्याकडे पाहिले जाते त्यामुळे विकास कामांच्या जोरावर सुजित झावरे ही निवडणूक लढणार असल्याने तालुक्यात त्यांच्याकडे आता सक्षम पर्याय म्हणूनच पाहिले जात असून सुजित झावरे मैदानात येणार असल्याने विरोधकांना घाम फुटला आहे.**

### अनेक पिढ्यांचा राजकीय वारसा

**स्वर्गीय आमदार वसंतराव झावरे पाटील पारनेर तालुक्याचे दहा वर्ष आमदार होते. त्यांच्या माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लागली सुजित झावरे पाटील यांनी त्यांचा राजकीय वारसा पुढे चालवला असून खऱ्या अर्थाने सुजित झावरे यांना आजी आजोबा व वडिलांपासून खऱ्या अर्थाने राजकीय वारसा असल्याने त्यांच्याकडे एका वेगळ्या अपेक्षणे आता तालुक्यात पाहिले जात आहे.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com